मानतीय संचालक मंडळ सभेचे

प्रतिवृत्त पुस्तक

(दिनांक ५-५-१९९९ ते दिनांक २२-०७-२००१)

ART - ठराव नोंदवही आर्ट - [illegible]

अ.

"प्रमाणित करण्यांत येते की,
"ह्या पुस्तकांत, अ.क्र.१ ते ४०० पर्यंत पाने आहेत".

Manager (Officiating)
The Nagpur Dist. C. C. Bank Ltd.
Ruikar Road, Gandhisagar,
NAGPUR-18.

मा० संचालक मंडळ सभा

# अनुक्रमणिका


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९९८-९९ | | | | | |
| १. | ५.५.१९९८ | २ | | | |
| २ | २९.५.१९९८ | २६ | | | |
| ३ | १८.७.१९९८ | ३५ | | | |
| ४ | ५.८.१९९८ | ४९ | | | |
| ५ | २८.८.१९९८ | ६१ | | | |
| ६ | २८.९.१९९८ | ७० | | | |
| ७ | १५.१०.१९९८ | ७८ | | | |
| ८ | २१.११.१९९८ | ८० | | | |
| ९ | ०९.०१.१९९९ | ९१ | | | |
| १० | १९.०१.१९९९ | ९४। | | | |
| ११ | २०.०३.१९९९ | १०६ | | | |
| १९९९-२००० | | | | | |
| १ | १६.०४.१९९९ | १४४ | | | |
| २ | २६.०७.१९९९ | १६१ | | | |
| ३ | १८.०९.१९९९ | १६६ | | | |
| ४ | २६.१०.१९९९ | २०७ | | | |
| ५ | ०१.१२.१९९९ | २२१ | | | |
| ६ | ०३.०२.२००० | २३० | | | |
| ७ | ११.०२.२००० | २३६ | | | |
| २०००-२००१ | | | | | |
| १ | ०८.०४.२००० | २६७ | | | |
| २ | १०.०४.२००० | २९९ | | | |
| ३ | ६.०६.२००० | ३०४ | | | |
| ४ | १८.०६.२००० | ३२२ | | | |
| ५ | १४.०७.२००० | ३२८ | | | |
| ६ | १४.०८.२००० | ३४३ | | | |
| ७ | ३०.१०.२००० | ३४२ | | | |
| ८ | १९.१२.२००० | ३८५ | | | |
| ९ | २२.१.२००१ | ~~३८५~~ | | | |

बॅकेच्या मा. संचालक मंडळाची सभा मंगळवार दि. ५।५।१९९८ रोजी दुपारी १.०० वाजता बॅकेच्या मुख्यकार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृति सभागृहात बॅकेचे अध्यक्ष मा. श्री. द्वा. हि. कांकाणी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्री. द्वा. हि. कांकाणी | अध्यक्ष |
| २. मा. श्री. व. क. पाराशिवनीकर | उपाध्यक्ष |
| ३. मा. श्री. र. गो. बंग | संचालक |
| ४. मा. श्री. शि. ज. यादव | " |
| ५. मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ६. मा. श्री. अ. य. खराडे | " |
| ७. मा. श्री. व. गो. मनकवडे | " |
| ८. मा. श्री. बा. ना. दियेवार | " |
| ९. मा. श्री. श्या. डो. दरणे | " |
| १०. मा. श्री. वि. जा. राऊत | " |
| ११. मा. श्री. म. जा. नायडू | " |
| १२. मा. श्री. सु. सो. पोनीकर | " |
| १३. मा. श्री. म. अ. बिनेकर | " |
| १४. मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १५. मा. श्री. सु. छ. केदार | " |
| १६. मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १७. मा. श्री. मु. भि. पन्नासे | " |
| १८. मा. श्री. रा. गो. कापसे | " |
| १९. मा. सौ. कु. ग. किम्मतकर | संचालिका |
| २०. मा. श्रीमती सु. दे. ईटनकर | " |
| २१. मा. कु. मं. र. बांगडे | " |
| २२. मा. डॉ. वा. रा. कोरपे, प्रतिनीधी म. रा. सह. बॅक लि. मुंबई | |
| २३. मा. श्री. आर. आर. खोबरागडे | कर्मचारी प्रतिनीधी |
| २४. मा. श्री. जी. ए. अलोनी | " |
| २५. मा. श्री. एस. जी. बोरकर | " |
| २६. मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

— अनुपस्थित —

| | |
|---|---|
| १. मा. श्री. आ. चं. शहाणे | संचालक |

२. मा. श्री. श्री. ब. आष्टणकर संचालक
३. मा. श्री. चं. शं. देशमुख "
४. मा. श्री. र. दे. दुरगकर "
५. मा. श्री. ब. न. येरपुडे "
६. मा. श्री. बा. मा. तिडके, प्रतिनीधी, म.रा. सह. कृषि व ग्रामीण विकास बँक लि. मुंबई
७. मा. श्री. पुरुषोत्तम डाखोळे, अध्यक्ष जिल्हा परिषद, नागपूर
८. मा. श्री. अनिल पंत, जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर
९. मा. श्री. डि. पेन्हा, सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर (निमंत्रीत)
१०. मा. श्री. एस्. एस्. नानोटकर, विभागीय आधीकारी, म. रा. सह. बँक लि. विभागिय कार्यालय, नागपूर (निमंत्रित)
११. मा. श्री. एस्. एस्. सुपे, विशेष लेखा परिक्षक, वर्ग१ सह.संस्था (बँक) नागपूर (निमंत्रीत)

---

सभेच्या कार्यवाहीस सुरवात करण्यापूर्वी संचालक सर्वश्री भा. चं. शहाणे, श्री. ब. आस्टणकर, चं. शं. देशमुख, र. दे. दुरगकर व श्री. ब. न. येरपुडे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर संचालिका मा. श्रीमती सुमनताई ईटनकर यांची उमरेड नगरपरिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने संचालिका मा. सौ. कुसुमताई किम्मतकर ह्यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यांत आला.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेची कार्यवाही सुरु केली.

विषय क्रमांक १:. मागिल दि. १४।१।१९९८ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १:. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सभेत चर्चा होउन, मागील दि. १४।१।९८ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २:. मागिल सभेत पारीत झालेल्या ठरांवाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २:: मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी मागिल दि. १५।१।१९९८ रोजीचे मा. संचालक मंडळाचे सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहीती दिली. सभेत कार्यालयीन कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

—

विषय क्रमांक ३:: पुढील कालावधीकरिता मा. व्यवस्थापक समिती, कर्ज उपसमिती व इतर उपसमित्यांची निमुक्ती करणे तसेच संलग्न सहकारी संस्था व इतर सहकारी संस्थांवर प्रतिनीधींची निमुक्ती करणे.

ठराव क्रमांक ३:: मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगीतले की, पुढील कालावधीकरिता बँकेच्या पोटनियम क्रमांक २६ (xviii) नुसार व्यवस्थापक समिती, कर्जउपसमिती, सेवक उपसमिती व इतर उपसमित्या तसेच पोटनियम क्र. २६ (xxvi) नुसार बँकेला संलग्न असलेल्या सहकारी संस्था व इतर संस्थांवर प्रतिनीधींची निमुक्ती करावयाची आहे.

विषयावरील चर्चेत भाग घेतांना श्री. बिनेकर यांनी संचालक मंडळाचा कालावधी विचारात घेता जून्याच समित्या पुढेही कार्यरत ठेवाव्यात अशी सुचना केली. श्री. पॉनीकर यांनी पुढील कालावधीसाठी समित्यांची निमुक्ती व सहकारी संस्थांवर प्रतिनीधींची निमुक्ती करण्याबाबतचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत यावे, असे सुचविले. त्यास इतरही संचालकांनी सहमती दर्शविली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन पुढील कालावधीकरिता बँकेच्या पोटनियम क्रमांक २६ (xviii) नुसार व्यवस्थापक समिती, कर्ज उपसमिती सेवक उपसमिती व इतर उपसमित्या, तसेच पोटनियम क्र. २६ (xxvi) नुसार बँकेला संलग्न असलेल्या सहकारी संस्था व इतर सहकारी संस्थावर प्रतिनीधींची निमुक्ती करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष यांना देण्यांत येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ४:: सन् १९९८-९९ वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई यांचेकडे अल्पमुदत कर्जमर्यादा रु. १५००.०० लाख मागणीसाठी अर्ज करणेसंबधी दि. २०।३।१९९८ रोजीचे सर्क्युलर मिटींगमध्ये पारीत केलेला ठराव कायम करणे.

ठराव क्रमांक ४ :: मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन् १९९८-९९ करिता महाराष्ट्र राज्य सह. बँक मर्या. मुंबई यांचेकडे शेतकी अल्पमुदत कर्जमर्यादा मागणी अर्ज सादर करण्याचे दृष्टीने दि. २०।३।९८ रोजी सर्क्युलर मिटींग घेऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यांत आला. सदर ठराव कायम करून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे पाठवावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे सर्क्युलर मिटींगमध्ये पारीत केलेला ठराव सर्वानुमते कायम करण्यांत आला.

— Resolution —

Resolved to borrow during the year 1998-99 an amount of Rs. 1500.00 Lakhs only (Rs. Fifteen hundred lakhs only) out of which Rs. 200.00 lakhs only (Rs. Two hundred Lakhs only) for oil seeds production programme, Rs. 10.00 Lakhs only (Rs. Ten Lakhs only) for N.P.D.P. and Rs. 20.00 Lakhs (Rs. Twenty Lakhs only) for financing S.A.O. for tribals, from the Maharashtra State Co-operative Bank Ltd. Bombay (Incorporating the Vidarbha Co-operative Bank Ltd.) to apply for a credit limit for the like sum to the National Bank for Agriculture and Rural Development under section 21 (i) (i) read with section 21 (3) (b) or section 21 (3) (a) for Agricultural operations.

Passed Unanimously.

—

विषय क्रमांक ५ :: सन् १९९७-९८ चे मध्यम मुदती शेती कर्जाचे चालु वार्षिक हप्त्यास मुदतवाढ देणेसंबधी दि. २६।३।९८ चे मा. कर्ज उपसमितीने घेतलेल्या निर्णयास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ५ :: मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेकडून मध्यम कर्जासाठी दरवर्षी पतपुरवठा केला जातो. हे कर्ज साधारणत: ३ ते ५ वर्षे मुदतीचे असून त्याची परतफेड दरवर्षी हप्तेवारीने केली जाते. मध्यम मुदत कर्जवाटप करतांना पिकांमधून येणाऱ्या उत्पन्नाचा विचार गृहीत धरून सभासदांची कर्जपरतफेडीची

क्षमता ठरविली जाते. मध्यम मुदती सन १९९७-९८ मध्ये अतिवृष्टी, गारपीट यासारख्या नैसर्गीक आपत्तीमुळे खरीप व रब्बी हंगामातील सर्वच पिके बुडाली. त्यामुळे शेतकऱ्यांना कुठल्याही पिकांपासून मुळीच उत्पन्न झाले नाही. अशा दुष्काळी परिस्थीतीत सभासदांची परतफेडीची क्षमता नसल्याने ह्या वर्षी देय होणाऱ्या मध्यममुदत कर्जाच्या वार्षिक हप्त्यास एक वर्षाची मुदतवाढ देऊन त्यापुढील सर्व वार्षिक हप्त्यास प्रत्येकी एक वर्षाने मुदतवाढ द्यावी व ही मुदतवाढ मध्यम मुदत कर्जाच्या व्याजाची रक्कम भरणा करणाऱ्या सभासदांना देण्यांत यावी. तसेच अशी मुदतवाढ देण्यासाठी परवानगी देण्यांस राज्य बँकेला ठरावाद्वारे विनंती करण्यांत यावी, अशा आशयाचा ठराव दि. २६।३।९८ रोजीचे मा. कर्ज उपसमितीचे सभेत मंजूर करण्यांत आला असून सदर ठरावांस मा. संचालक मंडळाची मान्यता घेण्यांत यावी असे सुचविण्यांत आले.

विषयाचे अनुषंगाने सभेत सविस्तर चर्चा होउन मध्यम मुदती कर्जाचे चालु हप्त्यास मुदतवाढ देणेसंबधी दि. २६।३।९८ रोजी मा. कर्जउपसमितीने घेतलेल्या निर्णयास मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६:. गटसचिव संवर्गीकरण योजनेअंतर्गत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना द्यावयाच्या वाढिव संवर्ग निधी (ऑय.फंड) बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६:. मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने चर्चा होउन, हा विषय पुढील सभेपूढे ठेवण्यांत यावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७:. बँकेने मुख्यकार्यकारी अधिकारी पदाकरिता करावयाच्या नियुक्तीबाबत प्राप्त झालेल्या महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. एम.एस.बी/१३९७/प्र.क.४९७/२-सी, दि.२१ ऑक्टोबर १९९७ ची सभेला माहिती देणे व निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ७:. मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. एमएसबी-१३९७/प्रक्र.४९७/२-सी दिनांक २१ ऑक्टोबर १९९७ नुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या मुख्य

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निवडीसाठी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यांत आली असून या समितीत महाव्यवस्थापक, राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड), सरव्यवस्थापक, रिझर्व बँक नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँकींग मॅनेजमेंटचे बँकींग विषयातील तज्ञ, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यांत आला आहे. या समितीचे नियंत्रक अप्पर आयुक्त, व निबंधक, सहकारी संस्था, म.रा. पुणे हे राहतील.

वर नमुद केल्याप्रमाणे व्यावसायीक प्रशासनात निपूण असलेल्या उमेदवारांची संबंधित निवड समितीने निवड केल्यानंतर अशा उमेदवारांना नाबार्डशी विचार विनीमय करुन नियुक्तीचे आदेश देण्यात येतील असेही वरील पत्रात नमुद केले आहे.

आतापर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाचे बाबतीत, त्या त्या बँकांचे नोकरवर्गातून कार्यक्षमता, सेवाजेष्ठता, शैक्षणिक पात्रता इत्यादी विचारात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या जागा पदोन्नतीने वा राज्य बँक / शासनाकडून परसेवेवर अधिकारी घेऊन भरण्याची व्यवस्था त्या त्या बँकांकडून करण्यांत येते. यापूढे ही नियुक्ती उपरोक्त समितीमार्फत होणार आहे.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, जिल्हा मध्यवर्ती बँक ही स्वायत संस्था आहे. या स्वायत्त संस्थेच्या संचालक मंडळामध्ये राज्य शासन, नाबार्ड व राज्य बँकेच्या प्रतिनीधींचा समावेश हा असतोच व त्यांच्या उपस्थितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे निवडीबाबत निर्णय घेण्यांत येतो. त्यामूळे अधिकार स्वायत्त असलेल्या संचालकांकडून अधिकार काढून घेणे म्हणजे त्यांच्या अधिकारावर अतिक्रमण ठरणार आहे. यासाठी जिल्हा मध्यवर्ती बँकांचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे नियुक्तीबाबत सद्याची प्रचलीत पध्दती कायम ठेवण्यांत यावी, अशी विनंती शासनाकडे करण्यांत यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ८ : सामंजस्य करार (एम.ओ.यु.) अंतर्गत सन १९९८-९९ वर्षाकरिता ठरवून दिलेले उद्दीष्ठ तसेच कृती कार्यक्रमास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ८ : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले

दि. ११।४।९८ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयात झालेल्या सभेत सामंजस्य करारांतर्गत बँकेला सन् १९९८-९९ वर्षाकरिता कर्ज, ठेवी व इतर बाबींचे उद्दिष्ठ ठरवून देण्यांत आलेले आहे. त्यादृष्टीने कराराची अंमलबजावणी करण्याकरिता कालबध्द विकासात्मक कृतिकार्यक्रम नाबार्डने पुरस्कृत केलेला आहे. त्यानुसार बँकेच्या व्यवहारात वाढ करण्याचा व कामकाजात सुधारणा करण्याचा बँकेने प्रयत्न करावयाचा आहे.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन सामंजस्य कराराअंतर्गत (एम.ओ.यु.) बँकेला सन् १९९८-९९ वर्षाकरिता नाबार्डने ठरवून दिलेले उद्दिष्ठ तसेच कृती विकास कार्यक्रमास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली. तसेच सामंजस्य करारावर सह्या करण्याचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक श्री. ए. एन्. चौधरी ह्यांना देण्यांत येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ९ :. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ४३ नियम ३५ नुसार असलेली बाहेरील कर्जे उभारण्याची मुदत दि. ३०।६।१९९९ पर्यंत वाढवून मिळणेबाबत मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ९ :. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ४३ नियम ३५ अनुसार भागभांडवल + बचतफंड + इमारतनिधी - संचयीत तोटा यांच्या १२ पट बँकेचा निधी स्विकारण्याची क्षमता आहे. ही मर्यादा १२ पटीवरून २५ पटीपर्यंत वाढविण्यासाठी मा. जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर यांनी दिलेल्या परवानगीची मुदत दि. ३०।६।९८ रोजी संपत आहे.

दि. २७।५।९८ चे ताळेबंदानुसार ठेवी रु. २०९१५.१२ लाख आणि कर्जे व ओव्हरड्राफ्ट रु. ३६२.३२ लाख अशी एकुण रु. २१२८७.४४ लाख बाकी आहे. पुढील वर्षात बँकेच्या ठेवीत आणि कर्जात होणारी वाढ लक्षात घेता भागभांडवल रु. ७५३.५ लाख + बचतफंड रु. १९६.५३ लाख + इमारतनिधी रु. १६६.०२ लाख असे एकुण रु. १११६.४३ लाख - तोटा रु. १००.७६ लाख यांच्या २५ पट म्हणजे रु. २५३९१.७५ लाख निधी स्विकारण्याच्या परवानगीची मुदत दि. ३०।६।९९ पर्यंत वाढवून मिळण्यासाठी मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी. यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना देण्यांत येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १०:. सन् १९९५-९६ चा अंकेक्षण अहवाल व या अहवालावरील राज्य स्तरीय लेखा समितीचे परिक्षण अहवालावरील पुर्तता अहवालास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक १०:. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग १ सह. संस्था (बँक) नागपूर यांनी सन १९९५-९६ ह्या वर्षाचे अंकेक्षण पूर्ण करून अंकेक्षण अहवाल बँकेस सादर केला. या अहवालावरील दोष पुर्तता अहवाल कार्यालयाने तयार केला आहे. याच अहवालावरील राज्यस्तरीय लेखा समितीचा परिक्षण अहवाल सुध्दा बँकेस प्राप्त झाला असून दोष पुर्तता अहवाल कार्यालयाने तयार केला आहे.

उपरोक्त दोन्ही पुर्तता अहवालावर दि. ४।४।९८ व ११।४।९८ रोजीचे मा. अंकेक्षण पुर्तता उपसमितीमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत येउन काही किरकोळ दुरूस्त्यासह अहवालास स्विकृती देण्यांत आली व पुर्तता अहवाल मंजूरिसाठी मा. संचालक मंडळाचे सभेपूढे ठेवण्यांत यावे, असे ठरले.

विषयावर सविस्तर चर्चा होउन, सन् १९९५-९६ च्या अंकेक्षण अंकेक्षण अहवालावरील तसेच राज्यस्तरीय लेखा समितीचे परिक्षण अहवालावरील पुर्तता अहवालास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली. हे पुर्तता अहवाल संबाधितांकडे त्वरीत पाठविण्यांत यावेत, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ११:. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ११(१):. ~~मा. अध्य~~ बँकेने कर्ज वसुलीचे कार्यवाहीसाठी लिलावाद्वारे विकलेल्या वाहनाचे खरेदीसाठी कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११(१):. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेने बस, ट्रॅक्टर, ट्रक जीप, कार इत्यादी वाहनासाठी कर्जपुरवठा केला आहे. सदर कर्जाचे ३ हप्त्यापेक्षा अधिक कर्ज हप्ते थकीत झाल्यास अशा वाहनांची जप्ती करून लिलावाद्वारे विक्री करून बँकेला कर्जाची वसुली करावी लागते. लिलावाचे वेळी व्यापारी वर्ग एकत्र येउन विशिष्ठ रकमेच्या वर बोली जाउ देत नाहीत त्यामूळे वाहनाची योग्य किंमत येत नाही. व बँक कर्जाची रक्कम देखील वसुल होत नाही. त्यामुळे बँकेच्या लिलावातील वाहन खरेदीसाठी बँकेने कर्ज उपलब्ध करून दिल्यास व्यापारीवर्गाची

मक्तेदारी संपून शेतकरी व इतर इच्छुक व्यक्तीदेखील लिलावातील वाहन खरेदी करू शकतील.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, बँकेने कर्ज वसुलीचे कार्यवाहीसाठी लिलावाद्वारे विकलेल्या वाहनाचे खरेदीसाठी खालील अटींवर कर्जपुरवठा करण्यांत यावा, असे ठरले.

१. बँकेने कर्जाचे वसुलीसाठी लिलावाद्वारे विकलेल्या वाहनांचे खरेदीसाठीच कर्ज मंजूर केल्या जाईल.

२. जूने वाहन खरेदीसाठी कर्ज मंजूरीपूर्वी बँकेचे अधिकृत मुल्यांकन अधिकाऱ्यांकडून वाहनाचे मुल्यांकन करून मुल्यांकनाचे ५० टक्के इतके कर्ज मंजूर करण्यांत येईल.

३. कर्ज रकमेचे दिडपट किंमतीची स्थावर मालमत्ता बँकेस गहाण करून द्यावी लागेल किंवा त्यावर बोझा नोंदवावा लागेल.

४. आर.टी.ओ. टॅक्स किंवा इतर खर्च यासाठी कर्ज मंजूर करता येणार नाही.

५. कर्ज घेणारा व्यक्ती व जमानतदार नागपूर जिल्ह्यातील रहिवासी असावा.

६. लिलावातील वाहनासाठी कर्ज मंजूर झाल्यास वाहन खरेदीदार व बँक यांचे नांवाने परिवहन कार्यालयात नोंदणी झाल्यानंतरच वाहन खरेदीदाराचे ताब्यात देण्यांत येईल व यासाठी येणारा खर्च खरेदीदाराला करावा लागेल.

७. सदर कर्जाच्या परतफेडीचे मासिक हप्ते लिलावातील वाहनाची स्थिती बघून त्याप्रमाणे ठरवून देण्यांत येईल. किमान १२ व कमाल २४ मासिक हप्ते पाडून देण्यांत येतील.

८. सतत ३ हप्ते थकीत झाल्यास वाहन जप्तीची कारवाई करून येणारा जप्तीचा खर्च कर्जदाराकडून वसुल करण्यांत येईल व बँक कर्जवसुलीसाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्यांत येईल.

९. लिलावाद्वारे विकलेल्या वाहनासाठी फक्त एकदाच कर्ज मंजूर करण्यांत येईल.

१०. बँकेच्या लिलावातील वाहनावर कर्ज हवे असल्यास तसा अर्ज बँकेला सादर करावा लागेल व अशा प्रकरणासाठी लिलावातील उर्वरीत रक्कम भरण्यासाठी बँक १५ दिवसाचा अवधी देईल. या १५ दिवसाचे काळात उद्योजकाला कर्ज मंजूर करून घेण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्राची पुर्तता करून द्यावी लागेल. अन्यथः लिलावात भरलेली अग्रीम रक्कम जप्त करण्याचा अधिकार बँकेस राहील.

११. वरील अटीत बदल करण्याचा अधिकार बँकेला राहील.

— ठराव सर्वानुमते मंजूर.